**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.१२५८९/२०२५**
**सरकार वि.पिंकी कारंडे व इतर**
**नि.क्र.७/खाली**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांव - राहुल सुभाष दळवी
वय - ३६ वर्षे, व्यवसाय - पो.कॉ. ब.नं.३७२
राहणार – शाहुपूरी पोलीस स्टेशन, कोल्हापूर

**<u>सरकार पक्षातर्फे सरतपास श्रीमती एस.एस. चव्हाण, सरकारी वकील यांचेतर्फे-</u>**

१. दिनांक ०२/०६/२०२५ रोजी मी रात्री ९.०० ते सकाळी ९.०० या वेळेमध्ये चार्ली क्र.१ येथे डयुटीवर होतो. सकाळी अंदाजे ७.३० वा च्या दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ दोन महिला वायरचे बंडल बाळगून मिळून आल्या. त्यांना त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यांनी त्यांचे नाव विचारले असता त्यांनी पिंकी कारंडे व रत्ना कांबळे असे सांगितले. त्यानंतर मी घटनेबाबत पोलीस स्टेशनमध्ये कळविले व शहाजी पाटील यांनी घटनास्थळ पंचनामा केला व वायरचे बंडल जप्त केले. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर शहाजी पाटील व पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.९</u>** देण्यात येत आहे. त्यांनतर मी घटनेची फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१०</u>** देण्यात येत आहे. आता मला छापिल प्रथमखबरी अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.११** देण्यात येत आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. त्या आज न्यायालयात हजर नाहीत.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**
**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.ए.आर. शिंदे यांचे मार्फत</u>**

२. घटनेच्या दिवशी मी डयुटीवर हजर असल्याबाबतचे कागदपत्रे दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ नेहमी वर्दळ असते. हे म्हणणे खरे नाही की, सकाळी ५.३० वा च्या दरम्यान त्या ठिकाणी वर्दळ असते. हे म्हणणे खरे नाही की, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ नेहमी पोलीस गार्ड असतात. हे म्हणणे खरे नाही की, दोन महिलांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे विचारपूस केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्याकडे वायरचे बंडल मिळाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, महिलांकडे वायरचे बंडल नसताना पोलीस असल्याचा धाक दाखवून त्यांच्याविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात घटनेबाबत खोटी माहिती दिली व आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. वायरचे बंडल

कोणाच्या मालकीचे होते हे मला माहित नाही व त्याचे बिल दाखल केले नाही.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

( अ.वि. मुसळे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्याया.क्रं.०३,कोल्हापूर

दिनांक - २४/०७/२०२६.